REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# नागपूर व भंडारा जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत महिलांकरिता राबविल्या जाणा-या योजनांचे समाजशास्त्रीय अध्ययन



डॉ. मीनाक्षी श्रीहरी बेसेकर
समाजशास्त्र विभागप्रमुख,
श्रीमती गोपीकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर,
जिल्ह्या- भंडारा.

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात नागपूर व भंडारा जिल्ह्यातील अनुक्रमे १२० व १०५ आदिवासी महिलांकडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता **Two sample Z test** व **Two Proportion Z test** या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले.

## प्रस्तावणा

आधूनिक भारतीय समाजाचा समाजशस्त्रीय विचार करताना 'शहरी समाज' व 'ग्रामीण समाज' असे विभाजन केले जाते. असे विभाजन करताना एका महत्वाच्या परिसराकडे आणि समूहाकडे आपले जरा दुर्लक्ष होते. तो म्हणजे रानावनात, द-्याकपा-्यात राहणारा आदिवासी समाज होय.

आदिम समाजाच्या अभ्यासाचे महत्व सामाजिक मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर जीवनाच्या विविध क्षेत्रातील व्यक्तींना वाटत असलेल्या आदिवासींच्या अभ्यासाचे महत्व लक्षात घेणे गरजेचे ठरते. प्रशासक, सामाजिक कार्यकर्ते, कृषी आधिकारी, धर्मप्रसारक, शैक्षणिक संस्था, आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादी विविध क्षेत्रातील व्यक्ती व संस्था आदिम जीवनाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे आदिवासी विकासाच्या दृष्टिकोणातून तयार करण्यात आले आहे व या अंतर्गत विविध योजना राबवण्यात येतात. या योजनांपासून आदिवासींना प्राप्त झालेल्या लाभाचे अध्ययन व्यापक प्रमाणात करण्यात आले नाही. याच धर्तीवर नागपूर व भंडारा जिल्ह्यात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची परिणामकारकता किती व कोणत्या प्रमाणात आहे व या प्रकल्पांतर्गत लाभ घेतांना लाभार्थ्यांना कोणत्या अडचणी व समस्या येतात याचा शोध घेण्याचा विचार संशोधकाला आला. याच हेतूने संशोधकाने खालील विषय अध्ययना करिता निवडला.

**सारणी क्रमांक १: नागपूर व भंडारा जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत महिलांकरिता राबविल्या जाणा-या योजनांसंबंधी जागरूकतेची माहिती**

| योजना | नागपूर | | | | भंडारा | | | | Z | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | टक्के | नाही | टक्के | होय | टक्के | नाही | टक्के | | |
| कन्यादान योजना | ३९ | ३२.४ | ८१ | ६७.६ | २६ | २५.२ | ७६ | ७४.८ | 2.3767 | 0.01732 (<0.05) |
| आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | ११९ | ९९.३ | ०१ | ०.७ | ७६ | ७२.७ | २९ | २७.३ | 11.1741 | 0.000 (<0.0001) |
| दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप | ६१ | ५१.२ | ५९ | ४८.८ | ४२ | ४०.० | ६३ | ६०.० | 3.3651 | 0.00076 (<0.001) |
| आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना | ५४ | ४५.० | ६६ | ५५.० | २१ | २०.४ | ८४ | ७९.६ | 7.8947 | 0.000 (<0.0001) |
| सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना | ६१ | ५१.० | ५९ | ४९.० | २६ | २४.४ | ७९ | ७५.६ | 8.2491 | 0.000 (<0.0001) |
| Z | 7.8649 | | | | -18.6484 | | | | | |
| P | 0.000 (<0.0001) | | | | 0.000 (<0.0001) | | | | | |

Z- Z मूल्य; P- P मूल्य (सार्थकता)

उपरोक्त **सारणी क्रमांक १** मध्ये नागपूर व भंडारा जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत महिलांकरिता राबविल्या जाणाऱ्या योजनांसंबंधी जागरूकतेची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार नागपूर जिल्ह्यातील ९९.० टक्के आदिवासी उत्तरदाते आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या योजनेबाबत जागरूक असून, ५१.२ टक्के आदिवासी उत्तरदाते दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप या योजनेबाबत जागरूक होते. त्याचप्रमाणे सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना, आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना व कन्यादान योजना याबाबत जागरूक असणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांची टक्केवारी अनुक्रमे ५१.० टक्के, ४५.० टक्के व ३२.४ टक्के होती.

तसेच भंडारा जिल्ह्यातील ७२.७ टक्के आदिवासी उत्तरदाते आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या योजनेबाबत जागरूक असून, ४० टक्के आदिवासी उत्तरदाते दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप या योजनेबाबत जागरूक होते. त्याचप्रमाणे कन्यादान योजना, सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना याबाबत जागरूक असणाऱ्या भंडारा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांची टक्केवारी अनुक्रमे २५.२ टक्के, २४.४ टक्के व २०.४ टक्के होती.

उपरोक्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, नागपूर जिल्ह्यातील महत्वपूर्णपणे **($Z=7.8649$; $P<0.0001$)** अधिक आदिवासी नागरिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आर्थिक विकास योजनांबाबत जागरूक आहेत, तर भंडारा जिल्ह्यातील सार्थकरित्या **($Z=-18.6484$; $P<0.0001$)** अधिक आदिवासी नागरिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आर्थिक विकास योजनांबाबत जागरूक नसल्याचे निदर्शनास आले.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत योजनांचा तपशिलवार विचार केला असता असे निदर्शनास येते की, कन्यादान योजना **($Z=2.3767$; $P<0.05$)**; आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती **($Z=11.1741$; $P<0.0001$)**; दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप **($Z=3.3651$; $P<0.001$)**; आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना **($Z=7.8947$; $P<0.0001$)** व सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना **($Z=8.2491$; $P<0.0001$)** या सर्व योजनांबाबत भंडारा जिल्ह्यातील आदिवासी नागरीकांच्या तुलनेत नागपूर जिल्ह्यातील आदिवासी नागरीक महत्वपूर्णपणे **($P<0.05$)** अधिक जागरूक आहेत. परिणाम हे देखील दर्शवितात की, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कन्यादान योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना या योजनांसंदर्भात नागपूर व भंडारा या दोन्ही जिल्ह्यातील बहुतांश आदिवासी नागरीकांदरम्यान जागरूकता नाही.

## निष्कर्ष

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कन्यादान योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना या योजनांसंदर्भात नागपूर व भंडारा या दोन्ही जिल्ह्यातील बहुतांश आदिवासी महिलांना जागरूकता नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कन्यादान योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना या योजनांसंदर्भात नागपूर व भंडारा या दोन्ही जिल्ह्यातील बहुतांश आदिवासी नागरीकांदरम्यान जागरूकता नाही.

## संदर्भ ग्रंथ सुची


१. डॉ. एस. जी. देवगांवकर (२०११), आदिवासी विकास प्रशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
२. मेश्राम प्रा. सुरेश (२०००), प्रात्याशिक सामाजिक संशोधन,कृष्णचंद्र एजन्सीज, लक्ष्मीनगर, नागपूर.
३. उंबरकर डॉ. दिनकर (२००७), कोरकु आदिवासी, अवैत प्रकाशत गजानन पेठ, अकोला
४. मांडवकर भाऊ (१९६६), कोलाम, सेवा प्रकाशन रूख्मिणीनगर, विस्तार **नागपूर**
५. मांडवकर भाऊ (१९९७), आदिवासी, सेवा प्रकाशन **नागपूर**
६. शिरोळे डॉ. धैर्यशिल (२००२), आदिवासी कथा व व्यथा
७. खडसे डॉ. भा.की. (१९९९), सामाजिक मानवशास्त्र, मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर
८. पाटे सुमन (१९९९), सामाजिक मानवशास्त्र विश्व पब्लिशर्स ॲंड डिस्ट्रीब्युटर्स
९. कऱ्हाडे डॉ. बी.एम. (२००७), शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲंड कं. पब्लिशर्स
१०. घाटोळे प्रा.रा.ना. (१९९०), समाजशास्त्र संशोधन तत्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर – १०
११. हेमणे प्रविणकुमार (२००८), जनरल नॉलेज जालु घडामोडी, विनर्स प्रकाशन, धामणगांव रोड, भंडारा
१२. विविध योजना व त्याची माहिती २००६ ते २०१२ अप्पर आयुक्त, आदिवासी विकास **नागपूर** व भंडारा
१३. बेंटन विल्यम (१९७३), एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका, व्हॅल्यूम-१०. प्रिंटेड इन द. यू.एस. ए.,
१४. बोबडे प्रकाश, लोटे रा. ज. (१९९३), सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.